# देगलूर महाविद्यालयाच्या कु. अकांक्षा कर्णेला तीन सुवर्ण पदक प्रदान

देगलूर (प्रतिनिधी) :-



अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. अकांक्षा लक्ष्मणराव कर्णे या विद्यार्थीनी ला उन्हाळी २०२४ मध्ये झालेल्या विद्यापीठीय परीक्षेत एम ए राज्यशास्त्र या विषयात विद्यापीठात गुणानुक्रमे प्रथम क्रमांकआल्याबदल स्वा रा ती म विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या हस्ते तीन सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.

कु. अकांक्षा कर्णेला प्राप्त झालेल्या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य एम एम चमकुडे, उपप्राचार्य डॉ व्ही जी शेरीकर, पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ आर बी लक्षटे, डॉ माधव चोले, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे

Scanned with OKEN Scanner